# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०८/०३/२०१९
## दि.०७/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे १७९/१९,भादविक ३०७,५०४,३४ आर्म ॲक्ट कलम ३,७(२७),महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३)सह १३५,क्रिमीनल लॉ.अमेडमेंट ॲक्ट कलम ७ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-२१ वर्षे,रा.देहुरोड,पुणे |
| **आरोपी** | एकुण तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०३/२०१९ रोजी १५/०० वा. ते १५/१५ वा.चे दरम्यान मा.न्यायालय गेट नं.३, शिवाजीनगर,पुणेचे समोर रेल्वे लाईन,सुरक्षा भिंती लगत कामगार पुतळा चौक,शिवाजीनगर पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्र १.प्रतिक डोके २.गणेश पुरी ३.सोनु शेख असे मा.न्यायालय गेट नं.३,शिवाजीनगर,पुणेचे समोर रेल्वे लाईन सुरक्षा भिंतीलगत असलेल्या झाडाखाली थांबलेले असताना,सदर ठिकाणी यातील नमुद इसमांनी त्यांचे मोटार सायकलवरून कोर्टाचे बाजुने फिर्यादीचे जवळ येऊन त्यांना शिवीगाळ केली. त्यावेळी फिर्यादी व त्यांचे मित्र असे भिंतीवरुन उडया मारुन रेल्वे लाईनने दिशेने पळत असताना,त्यांनी फिर्यादी यांचे दिशेने रिव्हॉल्वर रोखुन त्यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने त्यांचे दिशेने गोळीबार केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहाय्यक पोलीस निरीक्षक, रणजीत भोईटे ८३०८२७८८९९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे २१८/१९,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | सलामत शेख,वय-३० वर्षे,रा.गंगानगर,फुरसुंगी,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | अस्लम शेख ऊर्फ बिल्ला,रा.वेताळबाबा वसाहत,हडपसर,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०३/२०१९ रोजी २०/०० वा.न्यु टिप टॉप,हेअर सलुन,स.नं. १३,सातववाडी कमानी जवळ,हडपसर,पुणे या दुकानात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे न्यु टिप टॉप हेअर सलुन या दुकानात असताना,यातील नमुद इसम अस्लम शेख ऊर्फ बिल्ला हा त्यांचे दुकानात भांग पाडण्याचा बहाणा करुन,फिर्यादी यांना दमदाटी करुन जबरदस्तीने कॅश काऊन्टरचे ड्राव्हर मधील एकुण १,९००/- रुपये रोख रक्कम काढुन घेवुन पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, पी.एम.लोणारे ९९२३४४४९९८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे २०२/१९,भादविक ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४,महा.नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ठ व आघोरी प्रथा व जादुटोना प्रति.व उच्चाटन अध्या.२०१३ चे क.३(२) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२३ वर्षे,रा.कात्रज-कोंढवा रोड,पुणे सद्या रा.खेड,ता.खेड,जि.पुणे |
| **आरोपी** | १.पती, सासु व सासरे,रा.कात्रज-कोंढवा रोड,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०४/२०१८ ते दि.१६/११/२०१८ रोजीपर्यंत १९/०० वा.वेळोवेळी कात्रज-कोंढवा रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद पती, सासु व सासरे यांनी संगनमत करून,फिर्यादी यांना तुला मंगळ गुरू असल्याने तुझी शांती करायची आहे या विधीकरीता माहेरून ३ लाख रूपये घेवुन ये,पैसे आणले नाही तर तुला सोडचिठ्ठी देवु अशी धमकी देवुन,फिर्यादी यांचे वडीलांकडुन १ लाख रूपये घेतले. तसेच फिर्यादी यांचे सासुला अघोरी विद्या करण्याची सवय असुन तीने फिर्यादीचे मनात भिती व दहशत निर्माण करून,सदरचा विधी करण्यासाठी माहेरून पैसे आणण्याकरीता प्रवृत्त करून,फिर्यादीस शिवीगाळ व दमदाटी करून,तीचेवर तोडगा काढण्या करीता तीचे इच्छेविरुद्ध न-हे येथील भोंदु बाबाकडे अमावस्याव व पोर्णिमेला नेहमी घेवुन जात होती. |

| | |
|---|---|
| | फिर्यादी यानी त्यास विरोध केला असता,तीस वेळोवेळी गाडीत घालुन, गाडीत बसत नसल्यास हाताने मारहाण करून,तीचे माहेरून राहिलेले २ लाख रूपये घेवुन ये अशी धमकी देवुन,दि.१६/११/२०१८ रोजी फिर्यादीस घराबाहेर काढुन,तीचा शारिरीक व मानसिक छळ केला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. आर.ए.पवार ९८२३२११५६३ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे ४८/१९,भादविक ४१९,४२० |
| **फिर्यादी** | सचिन कदम,वय-३३ वर्षे,रा.कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे ऑक्टोंबर २०१८ ते आजपर्यंत ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | अज्ञात मोबाईलधारक इसमांनी फिर्यादी यांना फोन करून त्यांना मोबाईल टॉवरसाठी त्यांची जागा भाडेतत्वावर घेण्याच्या बहाण्याने फिर्यादी यांचेकडुन नमुद कालावधी मध्ये ऑनलाईन माध्यमाव्दारे एकुण ६१३५०/- रुची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. गुप्ता ९८५०८२०३०७ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे १७८/१९,भादविक ४२०,४६७,४६८,४७१,४७४,३४ |
| **फिर्यादी** | अजय चावला,वय-५९,रा.पश्चिम मुंबई |
| **आरोपी** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०३/२०१६ ते दि.३१/०३/२०१६ रोजीचे दरम्यान मा.न्यायालय,शिवाजीनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी स्वतःचे फायदयाकरीता व फिर्यादी यांची फसवणुक करण्याचे उद्देशाने बनावट नकाशा तयार करून,तो फिर्यादी यांचे विरूध्द मा.दिवाणी न्यायालयात दाव्याचे सुनावणी वेळी मा.न्यायालय,शिवाजीनगर,पुणे येथे सादर केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे), यु.बी.शिंदे ७०३०२२५५५५ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे ६७/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | राजेद्र कानोरीया,वय-७१ वर्ष,रा.एंरवडणे,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/११/२०१८ रोजी २०/११ वा.चे दरम्यान फिर्यादिचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे फोनवर नमुद अज्ञात मोबाईलधारकाने फोन करून,त्यांना फसवुन ओटीपीनंबर प्राप्त करून घेवुन,पेटीयमव्दारे ओटीपीचा नंबर वापरुन,फिर्यादि यांचे संमती शिवाय १३,९९९/- रकमेचा अपहार केला आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. दिपक लगड ९८२३३८२३३३ |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ७३/१९,भादविक ४२०,४०६,३४ |
| **फिर्यादी** | बाळासाहेब काटे,वय-६४ वर्ष,ृरा.जाधव वस्ती,कळस,पुणे |
| **आरोपी** | दोन इसम व दोन महिला,सर्व रा.दादाची वस्ती,वाघोली,लोहगाव रोड,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१५ ते आजपर्यत फिर्यादीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील नमुद इसम व महिला यांनी सगंनमत करुन,फिर्यादी व इतर लोकांचा विश्वास संपादन करून,त्यांना फंडात रक्कम गुतंविण्यास भाग पाडुन,फंडावर मिळणा-या ज्यादा पैशाचे अमिष दाखवुन,सदर इसमांनी स्वतःचे अस्तित्व लपवुन,फिर्यादी व इतर लोकांचे पैसे मागण्यास गेले असता त्यांना पैसे देण्याची टाळाटाळ करुन,फिर्यादी व इतर लोकांची ७,२०,०००/- रुपयेची अर्थिक फसवणुक केंली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. आर.टी.दरवडे ९९२२९६५२३४ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे १४९/१९,भादविक ४२०,महाराष्ट्र वैदयकिय व्यवसाय अधिनियम १९६१ चे कलम ३३(२) व ३६(२) |
| **फिर्यादी** | डॉ.तिरुपती पांचाळ,वय-३१ वर्ष, (वैदयकिय अधिकारी,पुणे मनपा,पुणे) |
| **आरोपी** | एक पुरूष,रा.स.नं.१०,नशा मुक्ती केंद्र,येरवडा,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे डिसेंबर २०१८ ते दि.०६/०३/२०१९ रोजी १४/१५ वा.पर्यंत स.नं.१० भाजी मार्केट समोर नशा मुक्ती केंद्र,येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने नशा मुक्ती केंद्राचे नावाने जस्ट डाईल या वेबसाईटवर स्वतःचे फोटोखाली एम.बी.बी.एस. ही वैदयकीय पदवी धारण केलेली नसतानादेखील एमबीबीएस. ची पदवी लावुन त्याची जाहिरात करून,व्यवसाय करून,त्याने सदर बाबतची कोणतेही कागदपत्र सादर न केल्याने,सदर इसमाने स्वतःचे आर्थिक फायदयाकरीता जनतेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. बोबडे ८२०८०८९४४७ |

९

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे ६९/१९,भादविक ३५३,३३२ |
| **फिर्यादी** | रेश्मा उकरंडे, म.पो.हवा. डेक्कन वाहतुक विभाग,पुणे शहर |
| **आरोपी** | प्रितेश विजयकूमार शहा,वय - ४० वर्षे रा.बाजारपेठ रोड,खटाव,जि.सातारा (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०३/२०१९ रोजी १९/१५ वा. यशवंतराव चव्हाण पुल,कर्वे रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे वाहतुक नियमन करीत असताना,यातील नमुद इसमाने त्याच मोटार सायकलवरून पुना हॉस्पीटलकडून कर्वेरोडकडे जात असताना सिग्नल कटिंग केल्याने,त्यास बाजुला घेवुन मोटार वाहन कायदयाप्रमाणे कारवाई करीत असतांना,त्याने आरडा-ओरडा करून,त्यांचे अंगावर धावुन जावुन,धक्का-बुक्की करून,ते करीत असलेल्या शासकिय कामांत अडथळा आणला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मिलींद कांबळे ९७६५३९१२४० |

१०

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ९९/१९,भादविक ३८०,५११,४२७ |
| **फिर्यादी** | रामकृष्ण पिंपळीकर,वय-५६,रा.शंकर रोड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०३/२०१९ रोजी ११/१५ वा.स्टेट बँक ऑफ इंडीया,औद्योगिक शाखा एटीएम सेंटर, वाकडेवाडी,पुणे |
| **तपशिल** | कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी करण्याचे उद्देशाने स्टेट बँक ऑफ इंडीया,औद्योगिक शाखा एटीएम सेंटर,वाकडेवाडी,पुणे येथील एटीएम रूम मध्ये प्रवेश करून,एटीएम मशीनचा दरवाजा डायलर कशाचे तरी सहाय्याने तोडुन,एटीएम मशीन मधील रोख रूपये रक्कम चोरी करण्याचा प्रयत्न केला. तसेच एटीएम रूम मधील दोन्ही कॅमेरे तोडुन टाकल्यामुळे एटीएम मशीन व दोन्ही कॅमेरे यांचे अंदाजे १०००००/- रू किचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. महाडीक ९७६६६८८३२७ |

११

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे २००/१९,भादविक ३७९,३४ |
| **फिर्यादी** | शुभम प्रमोद टंगसाळे, वय २२ वर्ष, रा. शिवशंभोनगर गल्ली नं. ३, कात्रज कोंढवा रोड, कात्रज, पुणे. |
| **आरोपी** | दोन अनोळखी महिला १.सडपातळ, गोरी, नेसणीस पांढ-या रंगाची साडी व चष्मा घातलेली, वय अंदाजे ३८ वर्ष २.सडपातळ, गोरी, भगवा पंजाबी ड्रेस घातलेली वय अंदाजे ३२ वर्ष (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०३/२०१९ रोजी ०२/३० वा. शुभम ज्वेलर्स,दत्तनगर रोड,पुजा कॉम्पलेक्स,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे शुभम ज्वेलसचे दुकानात स्वतः सोने-खरेदी विक्रीचा व्यवहार करीत असताना,यातील नमुद दोन अनोळखी महिला या दुकानात सोन्याचे डोरले खरेदी करण्याचे बहाण्याने येवुन त्यांनी वेग-वेगळ्या प्रकारचे डोरले पहात असताना,सदर महिला यांनी फिर्यादी यांची नजर चुकवुन हातचलाखीने ६,०००/- रू किंचे सोन्याचे डोरले चोरून नेले आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.फौज. पी.पी.गुरव ९९२३२३७१०० |

**प्रेसनोट** दिनांक २५/०२/२०१९

**छायाचित्र स्पर्धा** "पोलीस इन ॲक्शन नागरीकांची सेवा आणि सुरक्षितेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर विनामुल्य छायाचित्र स्पर्धेबाबत.

पुणे पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या संकल्पनेतून १. प्रेस/ प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार ३. पोलीस खात्यातील अधिकारी/कर्मचारी त्यांचे कुटूंबिय या गटांकरीता "पोलीस इन ॲक्शन - नागरीकांची सेवा आणि सुरक्षिततेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर **विनामुल्य छायाचित्र** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेकरीता हौशी छायाचित्रकार या गटांमध्ये कोणीही नागरिक सहभागी होवु शकतो.

सदर स्पर्धेकरीता प्रथम क्रमांक - रोख ५००० रू व शिल्ड, द्वितीय क्रमांक, - रोख ३००० रू व शिल्ड, तृतीय क्रमांक - रोख २००० रू व शिल्ड व उत्तेजनार्थ २ बक्षीसे देण्यात येणार आहेत.

प्रवेशिका http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळावर उपलब्ध असून फोटो (इमेज) वरील दिलेल्या संकेत स्थळावर **ऑनलाईन** पाठवावेत.

**स्पर्धेसाठीचे नियम व अटी-**

१. प्रत्येक स्पर्धकाने जास्तीत जास्त ५ इमेज JPG फॉरमॅटमध्ये ३०० DPI 5 MB साईजचे ओरीजनल व स्वत काढलेल्या इमेज असाव्यात. इमेजवर कोणत्याही प्रकारचे वॉटरमार्क, लोगो, चिन्ह नसावे.
२. दिनांक २५/०२/२०१९ रोजीची ही मुदत दि.१२/०३/२०१९ पर्यंत वाढविली असुन दि.१२/०३/२०१९ पर्यंत प्रवेशिका व फोटो नमुद संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील
३. निवड झालेले फोटोग्राफ्स हे आयोजक आपल्या प्रदर्शनासाठी व माहिती पुस्तीकेसाठी वापरू शकतील.
४. इमेज पाठविण्यासाठी http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळाचा वापर करावा. सदरचे संकेतस्थळ **रजिस्ट्रेशन केल्यानंतरच** या स्पर्धेत भाग घेता येईल.
५. प्रत्येक स्पर्धकाने त्याचा ईमेल आयडी व मोबाईल नंबर देणे आवश्यक आहे.
६. मोबाईल किंवा स्मार्ट फोन ने काढलेली छायाचित्रे सुध्दा स्पर्धेत पाठविता येतील.
७. फोटोग्राफ निवडीसाठी परीक्षक समितीचा निर्णय अंतिम राहील.

**छायाचित्र स्पर्धेसाठी पुणे शहरातील १. प्रेस/प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार, ३. पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच त्यांचे कुटूंबिय असे गट आहेत. हौशी छायाचित्रकार गटात सर्व कॉलेजचे प्रिन्सीपल,व्याख्याते, कॉलेज विद्यार्थी, शिक्षकवृंद, सर्व पत्रकार, उत्सुक व इच्छुक नागरीक यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा. असे पुणे पोलीसांकडून आवाहन करण्यात येत आहे.**

**अधिक माहितीसाठी- संपर्क अधिकारी-**

१. श्री. अजित लकडे, पोलीस निरीक्षक, विशेष शाखा, पुणे शहर.- ८३२९८०४८३६







जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर